Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - “ Pedagogy And Teaching Learning ”

# प्रगतशील अध्यापन व अध्ययन

**श्रीमती सुनिता रामचंद्र क्षीरसागर,**
**छात्राध्यापक (एम.फिल),**
**ॲड.विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविदयालय, नाशिक.**

शिक्षण प्रक्रियेत अध्यापन व अध्ययनाचे स्थान अनन्य साधारण आहे. पध्दतशीर अध्यापनानेच सुजाण, सुविदय आणि सुसंस्कृत नागरिक घडविणे शक्य होते. परिणामकारक अध्यापन ही अनुभवातून विकास पावणारी बाब आहे. त्यामुळे ती सदैव नवनवीन रुपाने अध्यापन व अध्ययन या क्रियांतील आनंद अबाधित ठेवू शकते.

शालेय स्तरावर विविध घटकाचे व्यवस्थापन आणि प्रशासन कार्य केले जाते. उदा.वेळापत्रक विविध उपक्रम परिक्षा इत्यादी घटकाप्रमाणेच महत्वपूर्ण घटक म्हणजेच अध्यापन,अध्ययन प्रक्रिया होय.

बर्टन यांच्या मते अध्यापन म्हणजे अध्ययनासाठी चेतना, मार्गदर्शन, दिग्दर्शन व प्रोत्साहन होय

गिलफोर्ड यांच्या मते अनुभूतीद्वारा व्यक्तीच्या वर्तनात हळूहळू घडुन आलेला बदल म्हणजे अध्ययन होय.

नवनवीन तंत्रज्ञान वापरापूर्वी फक्त व्याख्यान पध्दतीने अध्यापन केले जायचे तर अध्ययन हे पाठांतरावर असल्याने विदयार्थ्यांना कंटाळा येत असे. आनंददायी वातावरण निर्माण होत नसे पण आज ज्ञानाचा प्रस्फोट झाला आहे. नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे अध्यापनात नाविण्यपूर्णता निर्माण झाली आणि विदयार्थ्यांची आकलनक्षमताही वाढली. अध्यापन व अध्ययानात इंटरनेट, इ लायब्ररी , इ लर्निंग, मास मिडीया कम्युनिकेशन, इत्यादी नवीन तंत्रज्ञानाचा वापर केल्याने अध्यापन व अध्ययन प्रगतशील होण्यास मदत होत आहे.

## अध्यापन व अध्ययन व्यवस्थापन व उपयोग

अध्यापन ही केवळ अध्ययनास सहाय्य करणारी क्रिया न राहता प्रत्यक्ष ज्ञान, कौशल्य, किंवा अनुदेशन देणारी तसेच अध्ययन कर्त्यांना प्रेरणा देणारी क्रिया ठरते. अध्यापन व अध्ययनाचे व्यवस्थापन व योग्य उपाय योजन करणे गरजेचे ठरते कारण अध्यापनाचा हेतू अध्ययन असू शकतो परंतु प्रत्येक वेळी अध्यापनामुळे अध्ययन होईलच असे नाही

बर्टन यांच्या मते अध्यापन व अध्ययन परिणामकारक होण्यासाठी त्यामध्ये आंतरसंबंध प्रस्तापित

करणे गरजेचे असते. तसेच पुढीलप्रमाणे कार्यप्रणाली करणे योग्य ठरेल.

०१.अध्यापनाची उददीष्टे निश्चित करणे.

०२.अध्यापनात अध्ययनार्थीना कृती प्रवृत्त करणे.

०३.अध्यानार्थ्यांचे मत ऐकूण घेण्याची वृत्ती ठेवणे.

०४.योग्य वातावरण निर्माण करण्यासाठी अध्ययनाचे सर्व नियम तत्वे सिध्दांत याचां योग्य प्रमाणात वापर करणे

०५.विदयार्थ्यांमध्ये चिकित्सक वृत्ती निर्माण करणे

शिक्षकाने केवळ माहिती न देता, माहिती मिळविणे व अध्यापनासाठी विदयार्थी समर्थ बनविणे महत्वाचे ठरते. कारण अध्यापन व अध्ययन या नाण्याच्या दोन बाजू असून दोहोंची भूमिका एकमेकांना पुरक असते. त्यान्वये अध्यापन व अध्ययनाचे व्यवस्थापन केले जाते.

**पारंपारिक अध्यापन पध्दती व दोष**

| अ.नं | अध्यापन पध्दती | दोष व मर्यादा |
|---|---|---|
| ०१ | चर्चा व प्रश्नोत्तरे | १. विदयार्थी व शिक्षक यांच्या सहभागाचा समतोल ठेवणे अवघड असते<br>२. विषयांतर होण्याचा संभव असतो<br>३. विदयार्थ्यांना आवश्यक पुर्वज्ञान नसल्यास पध्दती कार्यान्वीत होऊ शकत नाही |
| ०२ | व्याख्यान पध्दती | ०१ विदयार्थ्यांना अवधानक्षमता अत्यल्प असल्याने फारशी उपयुक्त ठरत नाही<br>०२ वेळेचा अपव्यय होण्याचा संभव असतो |
| ०३ | प्रयोग दिग्दर्शन | ०१ एका तासिकेत पूर्ण होणे कठिण<br>०२ पूर्वनियोजन अत्यावश्यक<br>०३सुक्ष्म प्रमाणातील बदल प्रयोगाद्वारे दाखविणे अवघड असते. |
| ०४ | विदयार्थी कृती व प्रात्यक्षिके | ०१ प्रयोग साहित्याचे संच भरपूर असणे आवश्यक असते. ०२. प्रत्येक विदयार्थ्यांस व्यक्तिगत मार्गदर्शन करणे् अवघड असते. |
| ०५ | पर्यवेक्षित अभ्यास | ०१ वेळेचा अपव्यय होण्याचा संभव असतो. ०२ विचार प्रवर्तक घटकांच्या अध्यापनास उपयुक्त नाही. ०३ पर्यवेक्षकाच्या योजकतेवर परिणामकारकता अवलंबून असते. |
| ०६ | क्षेत्रभेटी | ०१.वर्षातून २/४ वेळाच पुर्वनियोजनाने वापरणे शक्य होते ०२ अनुधावन करण्यात अडचणी येतात. |

पारंपारिक अध्यापन पध्दतीचे दोष दूर करण्यासाठी पुढील उपाय करता येतील.

**अध्यापन गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न**

संपूर्ण शिक्षण प्रक्रियेत अध्यापकांचे स्थान अनन्यसाधारण आहे. त्यांच्या अध्यापन गुणवत्तेवरच भावी पिढयांचे भवितव्य अवलंबून असल्याने अध्यापन , गुणवत्ता वाढीसाठी पुढीलप्रमाणे प्रयत्न करता येतील.

०१ नवीन शालेय वर्ष सुरु झाले की विषयवार गुरुजनांच्या सभा घेऊन आदर्श पाठाचे आयोजन करुन त्यावर चर्चा करणे.

०२ शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी कार्यशाळेचे आयोजन करणे.

०३ इलेक्ट्रिक व इलेक्ट्रॉनिक शैक्षणिक साधने वापरण्याचे शिक्षण देणे.

०४ शाळेमध्ये विविध तज्ज्ञ मंडळींची व्याख्याने आयोजित करणे.

०५ बाहेरील संस्थांच्या सहाय्याने प्रकल्प घेणे

०६ शिक्षकांच्या कल्पनांची देवाण घेवाण करणे

०७ वेगवेगळया उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करणे

०८ अन्यत्र शोध निबंध पाठविण्यास शिक्षकांना उदयुक्त करण् .

०९ गुणवत्ता वाढीसाठी कृती संशोधन करणे

**अध्यापनातील समाजाचा सहभाग**

अध्यापनाचा अंतीम हेतू सुविदय , सुजाण व सुसंस्कृत नागरिक घडविणे आहे सध्याचे शिक्षण हे व्यवहारापासून फार दूर असल्याने शालेय जीवनानंतर विदयार्थी समर्थपणे समाज जीवनाची वाटचाल करु शकत नाही. त्यामुळे समाजातील तज्ज्ञ व्यक्तींचा सहभाग उपयुक्त ठरेल. समाजाचा सहभाग दोन प्रकारे घेता येईल

०१ अ) शाळेतील विदयार्थी समाजाकडे जावुन शिक्षण घेतात

आ) समाजातील घटक वा सामाजिक संस्थांचे काही प्रतिनिधी शाळेत येवुन आपल्या अध्यापन कौशल्याचा लाभ शालेय विदयार्थी विदयार्थीनींना करुन देतात.

०२ अ) समाजाचा शालेय विषयांच्या अध्यापनात सहभाग उदा विदयार्थ्यांना व्यवसाय केंद्रावर (शेत, कारखाना, कार्यालय) नेवुन सप्रयोग प्रात्यक्षिकांसह अध्यापन करणे

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

आ) पुरक विषयांच्या अध्यापनातील सहभाग उदा विविध क्रीडा, कला व छंद यांचे मार्गदर्शन वर्ग आयोजित करणे

इ) नैतिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्ये रुजविण्यासाठी प्रयत्नात सहीाग उदा श्रमदान, रक्तदान, अंध्यश्रध्दा निर्मुलन, प्रथमोपचार, रुग्णसेवा आदीसाठी शिबीरे वा कार्यक्रम आयोजित करणे

ई) काही संस्था वा व्यक्ती अप्रत्यक्ष रितीने अध्यापनात सहभागी होतात उदा. वहया पुस्तके उपलब्ध करुन देणे, गणवेश देणे

उ) शिक्षक पालक संघाचे सहकार्य घेणे

**अध्यापनात नविन तंत्रज्ञानाचा वापर**




या तंत्रज्ञानाच्या वापराबरोबरच सांघिक अध्यापनाचा वापर करुन अध्यापन आनंददायी व परिणामकारक होवू शकते.


पारंपारिक अध्ययन हे १ श्रवण व २ पाठांतर यावर आधारित असल्याने पुढील दोष निर्माण होतात.

१) केवळ स्मरणावर आधारित अध्ययन असल्याने विदयार्थांना कंटाळा येतो

२) पाठांतर न झालेने शिक्षा होण्याच्या भितीने विदयार्थी शाळा सोडून देतात,

पारंपारिक अध्ययनातील दोष दूर होण्यासाठी अध्ययनात पुढील नवीन तंत्रज्ञानाचा वापर करता येईल.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "




या व्यतिरिक्त पुढीलप्रमाणे अध्ययन परिणामकारक करता येते

**०१ प्रकल्प आधारित अध्ययन**

यामुळे विदयार्थ्यांना स्वतःहुन अध्ययन करणची सवय लागुन विदयार्थी कृतीशिल बनतो

**०२ सामुदायिक अध्ययन**

छोटया छोटया गटातून केलेले ज्ञान संपादन दीर्घकाळ स्मरणात राहते.

**०३. तंत्रज्ञानाधिष्ठीत अध्ययन**

माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या युगात तंत्रज्ञानावर आधारित अध्ययन करणे ही काळाची गरज आहे.शिक्षकांनी वापरलेले तंत्रज्ञान आपण घरी वापरुन अध्ययन करु शकतो.

**०४.क्षेत्राधारित अध्ययन**

यामूळे व्यवहारिक कौशल्याचा विकास होतो

**०५ स्थिती आधारित अध्ययन**

प्राप्त केलेले ज्ञान हे दैनंदिन जिवनात वापरण्यासाठी उपयुक्त ठरते.विविध कौशल्याचा विकास होवुन अध्ययन वाढ होते उदा.विदयार्थ्यांना परकिय भाषा शिकावयाची असल्यास त्या ठिकाणी जावुन

त्या लोकांमध्ये राहून संबधित भाषा अवगत करेणे

**०६ .समस्या आधारित अध्ययन**,

विदयार्थी ज्ञानाची जोड कौशल्याला देवुन स्वनिर्भर व स्वावलंबी बनतो

**प्रगतशील अध्यापन अध्ययनात इ लर्निंगचे महत्व**

०१) पारंपारिक वर्ग अध्यापन पध्दतीला पूरक अध्यापन

०२) विविध तरासाठी इयत्तेसाठी इ लर्निंग टेक्नॉलॉजीचा वापर

०३)जगतील सर्वच ज्ञानाची माहिती विदयार्थ्यांना मिळण्यासाठी उपयुक्त

०४)विविध माहिती एकत्रित करुन अध्यापन अध्ययनासाठी उपयुक्त

०५) विदर्याथी शिक्षकांमधील योग्य दूवा

०६) अध्यापन अध्ययन प्रक्रियेत कियाशिल सहभाग धेण्यासाठी उपयुक्त

०७)ई लर्निंग हे प्रभावी शिक्षकासारखेच कार्य करते.

वरील सर्व बाबींचा विचार करता थोडक्यात असे म्हणता येईल की, शिक्षणाचा प्रवास बघता पारंपारिक अध्ययन अध्यापन प्रक्रियेत शिक्षक व विदयार्थी समोरासमोर बसलेले असतात. माहिती व तंत्रज्ञानाचा उदय झाल्यावर पारंपारिक अध्ययन अध्यापनाला छेद देवुन तंत्रज्ञानाचा विशेषतः संगणकाचा व अलिकडे इंटरनेटचा मोइया प्रमाणावर वापर होतांना दिसतोय. या प्रकाराचा नियोजनपुर्वक उपयोग केल्यास अध्यापक व अध्ययनार्थी या दोघाचही प्रचंड फायदा होवून अध्ययन अध्यापनाला एक वेगळी उंची मिळाल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची**

०१ प्रा.दयानंद व प्रा.शिंदे के.डी. : शैक्षणिक व्यवस्थापन, श्री प्रकाशन पुणे

०२ प्रा.दयानंद व प्रा.शिंदे के.डी. : माहिती संप्रेषण तंत्रज्ञान, श्री प्रकाशन पुणे

०३ प्रा.नाममोती व प्रा.देसले सुनिल : प्रगत अध्यापनशास्त्र , सात्विक प्रकाशन नाशिक